आपलं महानगर

# मुंबईचे पाणी न रोखताच 'ऑपरेशन तानसा'

खास प्रतिनिधी ▸▸ मुंबई
connect@mymahanagar.com

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या तानसा पाईपलाईनला धक्का लागू न देता मुंबई मेट्रोच्या सहार स्टेशनच्या कामासाठीचे खोदकाम करण्यात आले आहे. अतिशय क्लिष्ट अशा जागेत काम करताना मेट्रोच्या टीमने आपला सगळा अनुभव पणाला लावला. त्यामुळेच एकही दिवस मुंबईचा पाणीपुरवठा बंद न करता हे काम मोठ्या शिताफीने पूर्ण करण्यात आले. पाण्याची पाईपलाईन, गॅस पाईपलाईन, पॉवर केबल आणि टेलिफोनच्या लाईन्स अशा अनेक सेवा पुरवठादार यंत्रणांच्या वाहिन्यांखाली हे काम मेट्रोच्या टीमने अतिशय अनुभवाचे प्रदर्शन करत पूर्ण केले आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या पाईपलाईनला कुठेही धक्का न लावता तसेच ही वाहिनी न वळवता हे काम पूर्ण केले आहे. महत्त्वाचे म्हणजे या कालावधित मुंबईतल्या पाणीपुरवठ्यावर कोणताही परिणाम झाला नाही.

मेट्रोच्या स्टेशन उभारणीच्या कामादरम्यान बॉटम अप या पद्धतीचा वापर करत हा संपूर्ण पाईपलाईनखालचा खडक पोखरण्यात आला. मुंबईत आढळणारा ब्लॅक बसाल्ट हा दगड मेट्रोच्या टीमने ओपन कट पद्धतीने पोखरला. मुंबईला अतिशय उच्च दाबाने पाणीपुरवठा करणाऱ्या तानसा पाईपलाईनच्या खालोखाल हे दगड पोखरण्याचे काम करणे हे मुख्य आव्हान या कामादरम्यान



## पाईपलाईनखालचा दगड पोखरून मार्ग

होते. सहार स्टेशनचे काम हे आगामी १५ ते १८ महिने या पाईपलाईनखाली चालणार आहे. त्यामुळे पाईपलाईनच्या मार्गाला कोणताही धक्का न देता आणि योग्य आधार देत हे काम करणे अतिशय आव्हानात्मक असे होते. पाईपलाईनखालची माती आणि दगड पोखरून काढताना पाईपलाईनची मूळ जागाही हलता कामा नये, हे महत्त्वाचे होते. पण, प्रत्येक मिनिटाला वापरण्यात आलेली मॉनिटरींगची पद्धत आणि अद्ययावत मशिनरीचा वापर करत दगड पोखरण्याच्या सगळ्या हालचालींच्या नोंदीमुळेच हे काम शक्य झाल्याचे समाधान मेट्रोच्या टीमने व्यक्त केले आहे.